दिनांक ०१ जानेवारी २०१८ रोजी मौजे कोरेगांव भिमा, ता.शिरुर, जि. पुणे येथे झालेल्या दंगलीतील आपद्ग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत. (रुपये ५,७५,०००/-)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः आरएलएफ-२० १८/प्र.क्र.२६/म-०३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः आरएलएफ-११-०३/प्र.क्र.३०१/म-३, दिनांक २४ ऑगस्ट २००४
२) शासन निर्णय क्रमांकः आरएलएफ/१२-०८/प्र.क्र.३१०/म-३, दिनांक ०१ डिसेंबर २००८
३) शासन निर्णय क्रमांकः आरएलएफ-२०१४/६३/प्र.क्र.३२९/म-३, दिनांक ५ जानेवारी,२०१६
४) जिल्हाधिकारी,पुणे यांचे पत्र क्रमांकः पगम/कावि/१२५/२०१८, दिनांक ११ जानेवारी २०१८

प्रस्तावना :-

जिल्हाधिकारी पुणे यांनी संदर्भाधीन क्र. ४ येथील पत्रान्वये, मौजे कोरेगांव भिमा, ता.शिरुर जि. पुणे येथील बाजारतळाजवळ दिनांक ०१ जानेवारी २०१८ रोजी दोन गटात झालेल्या वादातून इतर गावी मौजे कोंढापूरी, वढू, सणसवाडी ता. शिरुर येथे जमावामध्ये झालेल्या दगडफेक व जाळपोळीच्या घटनेमध्ये श्री. राहुल बाबाजी फटांगडे यांचा मृत्यू झाला असून श्री. राहुल परशुराम बोंगाडे जखमी झाले आहेत तसेच १) आठवले एंटरप्राईजेस, २) संजय फुलचंद मुधा व ३) सुरेश सकट यांचे घरांचे संपुर्ण नुकसान झालेले असल्याचे कळविले आहे व सदर दंगलीमुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्यासाठी रु. ६,१०,०००/- एवढ्या निधीची मागणी केलेली आहे.

संदर्भाधीन क्रमांक १ व २ येथील शासन निर्णयान्वये दहशतवादग्रस्त व दंगलग्रस्त आपदग्रस्तांना मदत देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याकरीता मदत देण्याबाबतचे दर निश्चित करण्यात आले आहेत तसेच संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयानुसार दहशतवाद, दंगल, बॉम्बस्फोट व नक्षलवादी कारवाया इत्यादी मानवनिर्मित आपत्तीमुळे झालेल्या मालमत्ता नुकसानीबाबत आपद्ग्रस्तांना द्यावयाच्या मदतीचे सुधारीत निकष व दर निश्चित करण्यात आले आहे. यानुसार जिल्हाधिकारी पुणे यांनी संदर्भाधीन क्र. ४ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मौजे कोरेगांव भिमा, ता.शिरुर, जि. पुणे येथील दंगलीमुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे:-

<u>शासन निर्णय :-</u>

१. उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार दिनांक १ जानेवारी २०१८ रोजी मौजे कोरेगांव भिमा, ता.शिरुर, जि. पुणे येथील बाजारतळाजवळ दोन गटात झालेल्या वादातून इतर गावी मौजे कोंढापूरी, वढू, सणसवाडी ता. शिरुर येथे जमावामध्ये झालेल्या दगडफेक व जाळपोळीच्या घटनेमध्ये बाधित झालेल्या खालील आपदग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासाठी त्यासमोर नमूद केल्यानुसार एकूण रु.५,७५,०००/-(रुपये पाच लक्ष पंचाहत्तर हजार फक्त) इतका निधी उपलब्ध करुन देण्यास याद्वारे शासन मंजुरी देण्यात येत आहे.

अ क्र.	आपदग्रस्तांचे नाव	शासन निर्णयानुसार वर्गवारी	मंजूर अनुदान
१.	श्री. राहुल बाबाजी फटांगडे	मृत व्यक्तींच्या वारसास	रु. ५,००,०००/-
२.	श्री. राहुल परशुराम बोंगाडे	जखमी	रु. ५०००/-
३.	आठवले एंटरप्राईजेस	पक्क्या घरांची दुरुस्ती	रु. ३५,०००/-
४.	संजय फुलचंद मुधा	पक्क्या घरांची दुरुस्ती	रु. ३५,०००/-
एकूण			**रु. ५,७५,०००**

२. याबाबतचा खर्च “मागणी क्र.सी-५, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम-२००-इतर कार्यक्रम, (०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तींना सहाय्य, ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२२३५ ०३४७) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदरचे अनुदान हे शासनाच्या दि. २४ ऑगस्ट २००४, दि. १ डिसेंबर २००८ व दि.५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील विहित निकष व दर तसेच नमुद अटींच्या अधीन राहून खर्च करण्यात येत आहे, याबाबतची दक्षता घेण्यात यावी. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची नियंत्रण अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

४. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोषागार/उप कोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणाऱ्या देयकासोबत जोडल्या जाणाऱ्या संगणक स्लीपमध्ये गौण/उप शिर्षाचा गणकयंत्र-संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा. तसेच खर्चाचा मेळ महालेखापाल यांनी नोंदविलेल्या खर्चाशी घेण्यात यावा व महालेखापालांच्या ताळमेळ प्रमाणपत्रासह विनियोजन लेखे शासनाकडे तात्काळ पाठवावेत.

५. सदर प्रकरणी खर्चाचे पत्रक विहित कालमर्यादेत न चुकता महसूल व वन विभागाला प्राप्त होईल, याची जिल्हाधिकारी, पुणे यांनी दक्षता घ्यावी. तसेच प्रचलित नियमानुसार मदतीचे वाटप करण्यात यावे. दि. २४ ऑगस्ट, २००४, दि. १ डिसेंबर २००८ व दि. ५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित केलेल्या अटी तसेच पंचनाम्यानुसार दंगल बाधितांना मदत देण्यासाठी मंजूर रक्कमेचा विनियोग करण्यात यावा. नियंत्रक अधिकाऱ्यांनी याबाबतचा हिशेब ठेवून निधीच्या विनियोगाबाबतची माहिती व उपयोगिता प्रमाणपत्र शासनास वेळीच सादर करावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १५/अर्थ-६/१८, दिनांक ७/२/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०११२३५५७३३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Ramchandra Bagane

Digitally signed by Dilip Ramchandra Bagane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d9bdeba4f5b208a7811899a0f4522d8086dc2e6e2655bea26b70db55378254d2, serialNumber=a4ff332f80ce4e5a25f28d86597d7ac1c7ca6c95d9241be4eb51488570f63a29, cn=Dilip Ramchandra Bagane
Date: 2018.03.01 12:36:26 +05'30'

(दि. रा. बागणे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, पुणे.
२. जिल्हाधिकारी, पुणे.
३. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा पुणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर.
६. संचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३२.
७. वित्त विभाग (व्यय-०९/व्यय-१०/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-६), मंत्रालय, मुंबई-३२.
८. कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१, म-११/पीएसी व पीएसी-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (कार्यासन म-०३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.